# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर, सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२९४५१००१
Mail ID : cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १८०/२०२३** **दिनांक : ०३.०६.२०२३.**

## मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तलाय चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई भरती सन २०२१ प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांवर गुन्हे दाखल केलेबाबत.

---ooo---

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे सर्व पोलीस घटकामध्ये चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई भरती सन २०२१ प्रक्रीया राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांच्या आस्थापनेवर एकुण ९८६ पोलीस शिपाई पदांची व १० पोलीस चालक शिपाई पदांकरीता पोलीस शिपाई भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रीयेकरीता पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी दि. ०६/११/२०२२ रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती, सदर जाहीरातीमध्ये चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई या पदांकरीता प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाअंतर्गत एकुण ५० पदे व भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणांअतर्गत एकुण २१ पदे आरक्षित ठेवण्यात आली आहेत.

सदर भरती प्रक्रीयेत उमेदवारांना आवेदन अर्ज भरण्याकरीता दि.०९/११/२०२२ ते दि.३०/११/२०२२ हा कालावधी देण्यात आला होता, तसेच नमुद पदासांठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा Policerecruitment2022.mahait.org या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली होती, त्या अनुषंगाने मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय या घटकामध्ये एकुण ७२००० आवेदन अर्ज प्राप्त झाले होते. त्यानुसार दि. ०२/०१/२०२३ ते दि.१६/०२/२०२३ दरम्यान मैदानी चाचणी घेण्यात आली. त्यांनतर दि. ०२/०४/२०२३ रोजी मैदानी परिक्षा पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेवुन दि.१४/०४/२०२३ रोजी दोन्ही परिक्षेत प्राप्त गुणानुसार एकुण ९९६ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी प्रकाशित करण्यात आली.

त्यादरम्यान पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे आस्थापनेवर पोलीस भरतीमध्ये उमेदवरांनी प्रकल्पग्रस्ताचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे पडताळणीदरम्यान आढळुन आल्याने संबधित उमेदवारावर गु.र.क्रं. २९१/२०२३ भा.द.वि.क. ४१९,४२०,४६७,४६८,४७१,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यावरुन मा. पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्याचेकडील क्रं.प्रशि/पोशि भरती/रिक्तपदे माहीती/१३२/ २०२०/१५४८/ दि.२५/०४/२०२३.अन्वये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत घेण्यात आलेल्या पोलीस भरती प्रक्रीया २०२१ मध्ये पोलीस शिपाई पदाकरीता प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांचे प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यावरुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई भरती २०२१ मध्ये प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाअंतर्गत तात्पुरत्या निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवारांचे प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त प्रमाणपत्राची पडताळणी करणेकामी मा.पोलीस आयुक्त, मिभाववि कार्यालयामार्फत विशेष पथक स्थापन करण्यात आले होते.

बीड व धुळे जिल्हाधिकारी/पुर्नवसन अधिकारी कार्यालय यांच्याकडुन प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणीमध्ये उमेदवार नामे १) फिरोज जहाँगीर पिंजारी, वय २९ वर्षे, चेस्ट क्र. ८३५४, रा.ठी. दिल्लीवाला जिन, केशरी नंदन हनुमान मंदिर जवळ, पारोळा रोड, धुळे, जि. धुळे, २) अमोल चंदु दिपके, वय २९ वर्षे, चेस्ट क्र. ३३१२२, रा.ठी. गाव राजोना, पोस्ट

खाडेगाव, ता. वसमत, जिल्हा हिंगोली, महाराष्ट्र. ३) तुकाराम अण्णा नैराळे, वय २७ वर्षे, चेस्ट क्र. २७७९१, रा.ठी. गाव नागझरी, पोस्ट डोंगरा, ता. पाटोदा, जिल्हा बीड, महाराष्ट्र. ४) कानिफनाथ कचरू पाखरे, वय २५ वर्षे, चेस्ट क्र. २४२८५, रा.ठी. मु.पो. पिंपळवाडी, ता.जि. बीड, महाराष्ट्र ५) चंद्रकांत सर्जेराव हिंदुळे, वय २६ वर्षे, चेस्ट क्र. २६०६५, रा.ठी. मु.पो. मार्कडवाडी, ता.शिरुर (का)जि. बीड, महाराष्ट्र व त्यांचे साथीदार यांनी बनावट प्रकल्पग्रस्ताचा दाखला तयार करुन शासनाची फसवणुक करण्याच्या कपटपुर्ण हेतूने, बनावट प्रकल्पग्रस्ताचा दाखला हा खरा असल्याचे भासवून त्याव्दारे पोलीस भरती समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी कागदपत्र पडताळणी दरम्यान अर्जासोबत नमुद बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र हे पोलीस आयुक्त, मिभावबि कार्यालयात सादर केले म्हणून त्यांचेविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले असून सदर गुन्हयांचा तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार करण्यात येत आहे.

१. काशिमीरा पोलीस ठाणे गुरनं ३९६/२०२३ भादवि ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,३४.
२. काशिमीरा पोलीस ठाणे गुरनं ३९७/२०२३ भादवि ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,३४.
३. काशिमीरा पोलीस ठाणे गुरनं ३९८/२०२३ भादवि ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,३४.
४. काशिमीरा पोलीस ठाणे गुरनं ३९९/२०२३ भादवि ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,३४.
५. काशिमीरा पोलीस ठाणे गुरनं ४०१/२०२३ भादवि ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,३४.

---ooo--